| MHNS240001022026 | **नियमित दिवाणी दावा क्र.२५/२०२६ मधील नि.क्र.०५ व ५० वरील संयुक्तीक आदेश.**<br>**पंढरीनाथ जिभाऊ बागुल व इतर**<br>**विरूद्ध**<br>**शिवाजी रामभाऊ आहिरे व इतर** |
|---|---|

(आदेश पारीत दिनांक ०३.०२.२०२६)

वादीने प्रस्तुत दावा हा जाहिरनामा व तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने या दाव्यामध्ये प्रस्तुतचे अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (***यापुढे याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे***) चे क्रम ३९, नियम १ व २ अन्वये दाखल केले असून या अर्जाद्वारे प्रतिवादींविरुध्द पोलीस निरिक्षक देवळा, भुकरमापक देवळा यांच्या मदतीने मंडल अधिकारी यांनी दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तहसिलदार, देवळा यांनी वहिवाट केस क्र.४०/२०२५ मध्ये दि.२९/१२/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाआधारे दावा मिळकतीतुन बेकायदेशिरपणे रस्ता काढण्याचा अगर खुला करण्याचा प्रयत्न करु नये याकरिता दाखल केला आहे. अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादीने त्यांचे शपथपत्र सादर केले आहे. प्रस्तुत आदेश हा वादीच्या नि.क्र.०५ वरील अर्जावरच असल्याने वादीने अर्जात केलेल्या कथनांचा या ठिकाणी पुनुरुल्लेख टाळण्यासाठी पुन्हा उल्लेख करण्यात आलेला नाही.

**दावा मिळकतीचे वर्णन** :-

**०२.** मौजे फुलेनगर, ता.देवळा, जिल्हा- नाशिक येथील वादी यांच्या मिळकतीचे वर्णन व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे,

| **अ.क्र.** | **गट क्रमांक** | **क्षेत्र (हे. आर)** |
|---|---|---|
| **१.** | ४८/१ | ०1हे-०९ आर |
| **२.** | ४८/१ | ००हे-९५ आर |

पुर्वेस-गट क्र.४९, ५३, ५४, ५५, ५६, ५७, पश्चिमेस - गट क्र.१९३ व स्मशानभुमी, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - गट क्र.७३.

**(येथून पुढे उपरोक्त वर्णनाच्या दावा मिळकतीस 'वाद मिळकत' म्हणून संबोधण्यात येते.)**

०३. मौजे फुलेनगर, ता.देवळा, जिल्हा– नाशिक येथील प्रतिवादी यांच्या मिळकतीचे वर्णन व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| | | हे. आर |
| १. | ४९ पैकी | ००हे–२४ आर + ००हे–०१ आर एकुण ००हे–२५ |
| २. | ४९ पैकी | ००हे–२५ आर |
| ३. | ४९ पैकी | ००हे–२५ आर |
| ४. | ५०/१ | ०१हे–०० आर +००हे–०१ आर एकुण ०१हे–०१ |
| ५. | ५१ पैकी | ००हे–५९ आर |
| ६. | ५१ पैकी | ००हे–५९ आर |
| ७. | ५१ पैकी | ००हे–५९ आर |
| ८. | ५१ पैकी | ००हे–५८ आर |
| ९. | ५१ पैकी | ००हे–५८.५० आर |
| १०. | ५१ पैकी | ००हे–६० आर |
| ११. | ५३ पैकी | ०१हे–०९ आर + ००हे–०१ आर एकुण ०१हे–१० आर |
| १२. | ५४ पैकी | ००हे–५५ आर |
| १३. | ५४ पैकी | ००हे–५५ आर +००हे–०१ आर एकुण ००हे–५६ आर |
| १४. | १५६ पैकी | ००हे–८० आर |
| १५. | १५६ पैकी | ००हे–६४ आर |
| १६. | १५६ पैकी | ००हे–३३ आर |

०४. प्रतिवादी क्र.०१ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे नि.क्र.५६ कडे दाखल करुन वादी यांच्या अर्जास प्रखर हरकत घेतली. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. वाय.ए. पाटील यांनी पुरशिस नि.क्र.५९ व पुरशिस नि.क्र.६० सादर करुन नि.क्र.५६ कडील म्हणणे हे इतर प्रतिवादींकरिता व दोन्ही अर्जांकरिता अंगिकृत केले आहे.

**०५.** प्रतिवादींचे कथनानुसार वादीने दाखल केलेला दावा, नि.क्र.०५ व नि.क्र.५० कडील अर्ज बेकायदेशिर आहेत. सदर अर्जास नॉन जॉईडर व मिस जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीजची बाधा येत आहे. प्रतिवादी व इतर शेतकरी हे दीर्घ काळापासून सदर वहिवाटी रस्त्याने त्यांच्या शेतजमिनींमध्ये ये–जा करीत असतात. वादीने कोणतेही वैध कारण नसताना दि.१०/०६/२०२५ रोजी जे.सी.बी.च्या सहाय्याने रस्त्यावर खड्डे खोदून व काटे–फांद्या टाकून अडथळा निर्माण केला. त्यामुळे प्रतिवादींना त्यांच्या शेतात जाणे–येणे तसेच शेती कसणे कठीण झाले आहे. वादीच्या सदर कृत्यामुळे त्यांची शेती पडीत राहण्याची भीती निर्माण होऊन त्यांना अपरिमित व न भरून येणारे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**०६.** प्रतिवादींचा वहिवाटी रस्ता हा वादीच्या गट क्र.४८/१ मधून जात असून त्या रस्त्यात वादीने निर्माण केलेला अडथळा काढून रस्ता पूर्ववत करण्यासाठी प्रतिवादी क्र.०१ ते १४ यांनी मामलेदार कोर्ट अधिनियम कलम ५(२) अन्वये वहिवाट अर्ज क्र.४०/२०२५ दाखल केला. सदर अर्जाच्या नोटीस उभय पक्षांना देवुन संधी दिल्यानंतर तहसीलदार, देवळा यांनी दि.२८/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण पंचनामा व नकाशा तयार केला व युक्तीवादाअंती दि.२९/१२/२०२५ रोजी प्रतिवादींचा वहिवाट अर्ज मंजूर केला व वादीस सदर वहिवाटी रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा अडथळा करू नये असे आदेश दिले. तहसिलदार यांनी दिलेला सदर आदेश कायदेशिर आहे. वादीने दाव्यामध्ये तहसीलदार, देवळा यांच्या आदेशास स्थगिती देण्यास कोणतेही ठोस किंवा प्रथमदर्शनी कायदेशीर मुद्दे मांडले नाहीत. तहसीलदार यांचा आदेश बेकायदेशीर आहे याबाबत कोणतेही विश्लेषण केले नाही. वादी यांनी केवळ “पर्यायी रस्ता” या मुद्द्यावर आधारित मोघम आरोप केले आहे. कलम ५(२) नुसार वहिवाटी रस्त्यातील अडथळा दूर करण्याचे तहसिलदार यांना अधिकार असून पर्यायी रस्त्याचा मुद्दा अप्रासंगिक आहे. तहसीलदार यांच्या आदेशाविरुद्ध कलम २३ अंतर्गत फेरतपासणी किंवा उच्च न्यायालयात रिट याचिका असा प्रभावी पर्यायी उपाय उपलब्ध असताना तो न वापरता वादीने सदर दावा दाखल केला आहे. वादी यांना प्रथमदर्शनी दावा नाही. न्यायाचा समतोल वादीच्या लाभात नाही. प्रतिवादी यांच्या विरुध्द मनाई आदेश दिल्यास त्यांची शेती पडित राहुन त्यांचेच

अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी नि.क्र.०५ व नि.क्र.५० कडील अर्ज नामंजुर करण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

**०७**. वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर. एन. बागुल व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.वाय.ए. पाटील यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले. मी, त्यांना खालीलप्रमाणे सकारण निष्कर्ष नोंदविला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतर्शनी दावा त्यांच्या बाजूने आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०२. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने झुकत आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०३. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

**वादी व प्रतिवादी तर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रेः–**

**०८.** वादी यांनी निशाणी क्र.०३ लगत दाखल केलेले कागदपत्र पुढीलप्रमाणे– गट क्र.४८/१, ४८/२, ४८, ४९, ५०/१, ५१, ५३, ५४, १५६, १५६/३/ब चा सातबारा उतारा, चालु असलेल्या शिवपांधी रस्त्याचे फोटो, देवळा येथील मा. तहसिलदार यांचेकडील वहिवाट क्र.४०/२०२५ मधील आदेशाची नक्कल प्रत, प्रतिवादींचे मिळकतीत येणे–जाणेसाठी चालु असलेला पर्यायी रस्त्याचा कच्चा नकाशा तसेच यादी नि.क्र.५३ लगत तहसिलदार देवळा यांचेकडील दि.२३/०१/२०२६ रोजीची नोटीस इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

तसेच प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठ्यार्थ नि.क्र.५८ लगत देवळा येथील वहिवाट अर्ज क्र.४०/२०२५ ची छायांकित प्रत, ग्रामपंचायत फुलेनगर यांनी दि.२६/०९/२०२४ रोजी तहसिलदार यांना केलेला अर्ज, दि.२८/०८/२०२५ रोजी तहसिलदार, देवळा यांनी केलेला स्थळ निरिक्षण टिपणी अहवाल व पंचनामा, शिवार नकाशाची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

:: **का र ण मी मां सा** ::

**मुद्दा क्र.०१ बाबत :–**

**०९.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा पहिला घटक म्हणजे सकृत दर्शनी केस (prima–facie case) वादीच्या बाजुने आहे किंवा नाही. तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी वादीस प्रथमदर्शनी दावा त्यांच्या बाजूने असून न्यायाचा समतोल त्याच्या बाजूनेच आहे हे सिद्ध करुन प्रतिवादी विरुद्ध मनाई हुकूम न दिल्यास त्याचेच अपरिमित नुकसान होणार असून प्रतिवादीस जास्त हाणी होणार नाही या तीन्ही बाबी सिद्ध करणे आवश्यक असते.

**१०.** वाद मिळकत ही वादी यांच्या मालकीची असल्याबाबत प्रतिवादी यांनी वाद उपस्थित केला नाही. वादी यांच्या कथनानुसार केवळ तहसिलदार, देवळा यांनी वहिवाट केस क्र.४०/२०२५ मधील आदेश हा बेकायदेशिर असुन सदर आदेशाची प्रतिवादींनी अंमलबजावणी करु नये. सदर ठिकाणी वादी यांना तहसिलदार, देवळा यांचा आदेश नेमका कोणत्या कारणास्तव बेकायदेशिर आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करावी लागेल. वादी यांनी त्याकामी तहसिलदार, देवळा यांनी दिलेल्या आदेशाची प्रत अभिलेखावर सादर केली असुन प्रतिवादींनी स्थळ निरिक्षण टिपणी व पंचनामा दाखल केला आहे. वादीचा दावा पाहता त्यांनी कलम ४ मध्ये तहसिलदार, देवळा यांनी वहिवाट केस क्र.४०/२०२५ मध्ये वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुण घेवुन प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर केल्याचे स्वतः कथन केलेले आहे. यावरुन सदर आदेश पारित करण्यापुर्वी तहसिलदार, देवळा यांनी उभयपक्षकारांना त्यांची बाजु मांडण्याची संधी दिल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी तहसिलदार, देवळा यांनी उभयपक्षकारांचे बाजु ऐकणे बाबतचे नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केल्याचे दिसुन येत आहे.

**११.** तहसिलदार, देवळा यांनी आदेश पारित करण्यापुर्वी स्थळ निरिक्षण केल्याचे देखिल दिसुन येत आहे. त्याकामी अभिलेखावर दाखल केलेला स्थळ निरिक्षण टिपणी पाहता त्यामध्ये नाल्याचे सुरुवातीस दक्षिणेस गट क्र.४८ व ४९ दिसुन येत असुन सदर नाल्याच्या उत्तरेस स्मशानभुमी दिसुन येते व फुले नगर ते वासोळ डांबरी रस्त्यापासुन सुमारे १०० फुट वहिवाट रस्ता दिसुन येत असुन पुढे खड्डे केल्याचे व त्यापुढे दगडाचा भराव करुन रस्ता अरुंद केल्याचे दिसुन येत असलेबाबत व त्यानंतर २०० फुटावर रस्त्यात काटेरी झाडे व रस्ता बंद असल्याचे दिसुन येत असल्याचे स्पष्ट कथन केले आहे. सदर टिपणी अहवालाप्रमाणे पंचनामा देखिल तयार केला असल्याचे दिसुन येत आहे. सदर स्थळपाहणी टिपणी अहवाल व पंचनामा तसेच उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकुन अंतिम न्यायनिर्णय दिल्याचे दिसुन येत आहे. यावरुन वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी कथन करत असल्याप्रमाणे रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादी यांनी यादी नि.क्र.५८ लगत दाखल केलेल्या ग्रामविकास अधिकारी व सरपंच ग्रामपंचायत फुले नगर यांनी तहसिलदार, देवळा यांना दि.२६/०९/२०२४ रोजी दिलेल्या अर्जाची पाहणी केली असता त्यावरुन देखिल वादातील रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसुन येत आहे. वादी यांचा दावा पाहता कलम ५ मधील सुरुवातीस वादग्रस्त रस्त्याची तहसिलदार यांनी योग्यरित्या पाहणी केली नसल्याचे कथन केले आहे. यावरुन देखिल वाद मिळकतीमध्ये रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसुन येत आहे. वादींच्या कथनानुसार प्रतिवादींना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. वाद मिळकतीमधील अंर्तगत रस्ता हा वादी यांचा खाजगी रस्ता असुन त्याच्याशी प्रतिवादीचा हक्क संबंध नाही. सदर कथनावरुन वादातील रस्ता अस्तित्वात असल्याचे वादी नकळतपणे कबुल करत आहे. वरिल सर्व कारणांचा विचार केला असता वादी यांनी तहसिलदार, देवळा यांनी वहिवाट अर्ज क्र.४०/२०२५ मधील आदेश बेकायदेशिर असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले नाही. त्यामुळे वादी यांनी सकृतदर्शनी दावा त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले नसल्याने, मी मुद्दा क्र.१ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ०२ बाबत</u> :–**

**१२.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असलेला दुसरा घटक म्हणजे न्यायाचा समतोल

(balance of convenience) म्हणजेच तुलनात्मक अपाय अथवा पक्षकाराची होणारी गैरसोय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीस किती अपाय होईल याबाबी सह सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीस किती अपाय होईल याबाबीचा देखील विचार करणे आवश्यक असते. प्रस्तुत **वादप्रश्न क्र.०१** चे निष्कर्षानुसार वादी सकृत दर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहेत. सध्यस्थितीत प्रतिवादी यांच्याविरूद्ध मनाई आदेश पारीत केला तर वादी पेक्षा जास्त प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल हा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करणेस वादीस अपयश आले असल्याने मी, **मुद्दा क्र.०२ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ०३ बाबत</u> :-**

**१३.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा तिसरा घटक अपरिमित नुकसान (irreparable loss) म्हणजे पैशाने कधीही न भरुन येणारी हाणी होय. वादी सकृत दर्शनी दावा त्याचे बाजुने तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यामुळे, अर्ज मंजुर केल्यास वादी पेक्षा जास्त प्रमाणात हाणी प्रतिवादी यांना होईल. म्हणुन प्रस्तुत अर्ज ना-मंजुर केलेस वादीचे अपरिमित असे नुकसान होणार नाही. वरील कारणास्तव मी, **मुद्दा क्र.०३ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ बाबत</u> :-**

**१४.** सकृत दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तीन्ही संज्ञा केवळ अलंकारीक भाषेचा नमुना नसुन सदर तीन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्व तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याने शाबीत करण्यास वादीस अपयश आले असल्याने वाद प्रश्न ०१ ते ०३ चे निष्कर्ष त्यानुसार नकारार्थी नोंदविण्यात आले आहेत. सबब, वरील विवेचनार्थ मी, **मुद्दा क्र.०४** करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आ दे श** ::

**०१**. अर्ज निशाणी क्र.०५ व नि.क्र.५० नामंजुर करण्यात येत आहेत.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करावा.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.02.03 16:42:44 +0530

**ठिकाण : सटाणा.** **( चारुदत्त उद्धव शिपकुले )**

**दिनांक:०३/०२/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सटाणा.**